म.वि.ले.से. सहायक संचालक
संवर्गातील अधिका-यांच्या तात्पुरत्या
पदोन्नती व पदस्थापना.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१.
19 MAY 2018
1915
प्राप्त झाले सही.........

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग,

शासन आदेश, क्रमांक :- संलेको २०१६/ प्र.क्र.२२९ (भाग-१)/कोषा प्रशा-२

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.दिनांक :- १८ मे, २०१८.

**शासन आदेश :** - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखाधिकारी संवर्गातील खालील विवरणपत्रामध्ये नमूद अधिकारी यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक (गट- अ कनिष्ठ) संवर्गात वेतनबँड रू. १५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन रु. ५४०० या वेतन श्रेणीतील पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसुचना, दि. १५/६/२०१७ मधील तरतुदीनुसार सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या नावासमोरील स्तंभ क्र. ३ मध्ये नमूद केलेले महसुली विभाग वाटप करण्यात येत आहेत. तसेच त्यांना खालील तक्त्यातील स्तंभ क्र. ४ मध्ये नमुद पदावर तात्पुरत्या पदोन्नती नंतरची पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | मागणी केलेला महसुली विभाग | वाटप केलेला महसुली विभाग | तात्पुरत्या पदोन्नतीने द्यावयाची पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | |
| १ | श्रीमती स्नेहल पाटील (ज्ये.क्र. ८८) | पुणे | नागपूर | सहायक संचालक (लेखा), महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना नागपूर |
| २ | श्रीमती ज. आ. शेख (ज्ये.क्र. ८९) | कोकण- २ | अमरावती | अंतर्गत लेखापरीक्षण अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती. |

३. सदर पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधिन राहून भरण्याबाबत सा.प्र.वि. / १६ ब यांनी दि. २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनूसार देण्यात येत आहे.

४. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने त्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

५. वरील अधिकाऱ्यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट- अ (कनिष्ठ) संवर्गात देण्यात आलेली पदोन्नती ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्यामुळे ती आयोगाच्या मान्यतेने नियमित करण्यात येईल.

६.  वरील अधिका-यांनी आपल्या पदोन्नत पदाचा कार्यभार या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत त्वरीत स्वीकारावा व तसे केल्याबद्दल कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र या विभागाकडे पाठवावे. विहित कालावधीत नियूक्ती न स्विकारल्यास पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील. तसेच श्रीमती पाटील व श्रीमती शेख यांनी मत्ता व दायित्व प्रमाणपत्र सादर केल्याची खात्री संचालनालय (ले व को), मुंबई यांनी करावी.

७.  सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १६/२/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर अधिकारी यांची सदर पदावर पदोन्नतीने पदस्थापना दर्शविण्यात आली आहे.

८.  सदर अधिकारी यांना शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही २०१७/ प्र.क्र.११४/कार्या-१२, दिनांक १५ जून, २०१७ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(मा. रा. गांधी)
अवर सचिव, वित्त विभाग

प्रत -:

१) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.*
२) प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय ,मुंबई *
४) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई *
५) प्रधान सचिव (ले व को) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) संबंधित अधिकारी *
७) संबंधित अधिकारी यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
८) संबंधित अधिकारी यांचे पदोन्नतीच्या पदाचे कार्यालय प्रमुख*.
९) मा. मंत्री / मा. राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) कक्ष अधिकारी,कोषा-प्र.१,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) निवड नस्ती. ,कोषा-प्र.२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

* (संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)